Rediffusion/Edelman

**Publication:** Pudhari
**Date:** 04/10/2013
**Edition:** Mumbai
**Page No:** 1
**Headline:** Search for IT knowledge; 'IT WIZ'

## आयटीचे ज्ञान जोखणार

# 'आयटी विझ'

**मुंबई : प्रतिनिधी**

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे 'आयटी विझ' २०१३ ही स्पर्धा रविवार २० ऑक्टोबर रोजी रविंद्र नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत आठवी ते बारावीत शिकणाऱ्या सर्व शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे.

या स्पर्धेसाठी शाळांना दोन - दोन स्पर्धकांचे एकाहून जास्त गट पाठवता येणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदोर, कोची, कोलकाता, लखनऊ, मुंबई, नागपूर व पुणे अशा १४ ठिकाणी घेण्यात येणार आहे. या १४ विभागीय फेऱ्यांमधून निवड झालेले विजेते 'स्मार्ट टेक विझार्ड्स २०१३' पुरस्काराकरिता डिसेंबरमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या अंतिम फेरीमध्ये विविध गटांशी स्पर्धा करतील. स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठविण्याची अंतिम मुदत १७ ऑक्टोबर आहे. स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका *www.tcsitwiz.com* या वेबसाईटवर पाठवाव्यात, असे आवाहन टीसीएसतर्फे करण्यात आले आहेत.

- भारतातील सर्वात मोठी प्रश्नमंजुषा
- प्रवेशिकेची अंतिम मुदत १७ ऑक्टोबर
- १४ ठिकाणी स्पर्धा पार पडणार

### प्रश्नमंजुषेचे स्वरूप

प्रारंभी लेखी चाचणी असणार आहे. उपस्थित सर्व टीम्सकरीता २० प्रश्नांचा सर्वसाधारण संच असणार आहे. या प्रश्नसंचावर विद्यार्थ्यांना लेखी उत्तरे द्यावी लागणार आहेत. लेखी परीक्षेतून पहिल्या सहा गटांची निवड अंतिम फेरीकरीता केली जाणार आहे. अंतिम फेरीकरीता एकाच शाळेकडून एकापेक्षा अधिक गट निवडले गेल्यास प्रत्येक शाळेतील जास्तीत जास्त गुण मिळवणाऱ्या गटालाच व्यासपीठावर बोलाविण्यात येईल. या सहा गटातील विजेता ठरलेला गट डिसेंबरमध्ये घेण्यात येणाऱ्या टीसीएस राष्ट्रीय पातळीवरील अंतिम फेरीत प्रतिनिधीत्व करेल.